# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव | बुधवार २४ सप्टेंबर २०२५ | वर्ष १ ले | अंक ३१५ | किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

✲ जागतिक कर्णबधीर जागरुकतादिन.

१८६१ : श्रेष्ठ देशभक्त मादाम भिकाजी कामा यांचा मुंबईत पार्शी कुटुंबात जन्म झाला.

१९३२ : पुणे करार झाला.

१९५४ : आचार्य अत्रे यांच्या मातोश्रींचे निधन झाले.

१९९४ : संपूर्ण सुरत शहर प्लेगग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले.

| सेन्सेक्स | ८२१०२.१० | -५७.८७(०.०७०%) |
|---|---|---|
| डॉलर | ₹ ८८.७६ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३१ | २३ |
| दिल्ली | ३५ | २६ |
| मुंबई | ३० | २५ |
| नागपूर | २८ | २२ |
| पुणे | २७ | २१ |

**सुविचार**

आपल्या भूतकाळातून शिकून, वर्तमानात जगा आणि भविष्याकडे आशावादाने पाहा.

| सुर्योदय | सुर्यास्त |
|---|---|
| स.-६:१७ | संध्या-६:२४ |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,१५,६९०/- | १,४०,०००/- |

**केळी भाव**

नवती : १६०१ ते १६५०

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना २ हजार २१५ कोटींची मदत



## • मंत्र्यांना पूरग्रस्त भागात भेटी देण्याच्या मुख्यमंत्री फडणवीसांच्या सूचना

**वृत्तसंस्था । मुंबई**

मराठवाड्यासह महाराष्ट्रातील काही भागांत सध्या मोठ्या प्रमाणावर पावसानं हजेरी लावली आहे. अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. शेतीचं मोठं नुकसान झाल्याचं चित्र महाराष्ट्रात दिसत आहे. पूरपरिस्थितीमुळे घराघरांत पाणी तर शिरलंच आहे, पण त्याचबरोबर शेतीमध्ये पिकांसोबत मातीही वाहून गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभं राहिलं आहे. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सगळा आढावा घेतल्यानंतर महत्त्वाची माहिती दिली आहे.

**नियमात आहे ती मदत आम्ही करीत आहोत : फडणवीस**

ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होते आहे त्याबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जी काही नियमांमध्ये आहे ती मदत आम्ही सुरु केलं आहे. सुरेश धस यांनी जे पत्र दिलं आहे त्यावर सकारात्मक विचार आम्ही करत आहोत. केंद्र सरकारची मदत घेऊ. पण राज्य सरकार थांबणार नाही. आपल्या शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करत आहोत. आत्तापर्यंत २२१५ कोटी रुपयांची मदत आम्ही केली आहे. त्यातले १८२९ कोटी रुपये पोहचले आहेत. बाकी रक्कम आठ ते दहा दिवसांत वाटप होईल, असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तातडीची मदतही आपण करतो आहे. ज्यांचं स्थलांतर केलं आहे त्यांच्या राहण्याची, जेवणाची सगळी व्यवस्था **(पान २ वर)**

### जळगाव बीड, परभणी जिल्ह्यात अतिवृष्टी

१७५.५ मिमी पाऊस पडला आहे. जो सरासरीच्या १०२ टक्के इतका आहे. बीड मध्ये मदत आणि बचावकार्य सुरु आहे. धाराशिवमध्ये हेलिकॉप्टरच्या मदतीने बचावकार्य सुरु आहे. लोकांना आपण स्थलांतरित केलं आहे. अतिरिक्त हेलिकॉप्टरची मागणी मंत्री गिरीश महाजन यांनी केली आहे. ही मागणीही पूर्ण करण्याचा माझा प्रयत्न आहे. जळगाव, बीड आणि परभणी या भागात अतिशय मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे. आठ जणांचा मृत्यू झाला आहे तर १० जण जखमी झाले आहेत. एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या १७ तुकड्या कार्यरत आहेत.

## ➤ शेतकरी राजा पुन्हा कसा उभा राहील याचा सरकारने विचार करावा; शरद पवारांचे आवाहन



मराठवाड्यात दुष्काळी भागातही पावसानं झोडपलं असून अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली. यात शेतीपिकांचे मोठे नुकसान झाल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. राज्यात सुरू असलेला पाऊस आणि नुकसानीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. केंद्र सरकारकडून राज्याला मदत करण्यासाठी ज्या योजना आहेत ते वापरून नुकसानभरपाई करणे गरजेचे असल्याची मागणी शरद पवार यांनी केली आहे.

**नेमकं काय म्हणाले शरद पवार?**

राज्यात यंदा अभूतपूर्व पाऊस पडला आहे. जे जिल्हे दुष्काळासाठी प्रसिद्ध आहेत त्या जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. अतिवृष्टीचा परिणाम शेतकऱ्यांच्या संसारावर झाला आहे. सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणावर होतं. याशिवाय इतर पिकंसुद्धा मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. पण त्यात सोयाबीनचे पीक भरवशाचे पीक असते. पिकं कुजून गेली आहेत तर सोयाबीन उद्ध्वस्त झालं. शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झालं असून सरकारने त्यांना मदत करावी, अशी मागणी शरद पवार यांनी केली आहे.

## थोडक्यात

### अर्शदीप सिंगने तर हारिस रौफची इज्जत काढली

**मुंबई ।** आशिया चषक २०२५ मधील भारत-पाकिस्तानमधील सुपर फोर सामन्यानंतर पाकिस्तान संघ प्रचंड ट्रोल होत आहे. भारतीय संघाचं उत्कृष्ट कामगिरीसाठी कौतुक केलं जात आहे. तर दुसरीकडे मात्र पाकिस्तानचे खेळाडू चाहत्यांच्या रडारवर आले आहेत. पाकिस्तानचा गोलंदाज हारिस रौफने सामन्यादरम्यान हद्द पार केली होती. त्याने सामन्यात विमान पाडण्याचे इशारे केले. यानंतर आता अर्शदीप सिंगने त्याला चांगलचं प्रत्युत्तर दिल्याचा व्हीडिओ समोर आला आहे.

### नवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी सोने, चांदीचा नवा विक्रम

**जळगाव ।** शहरातील सुवर्ण बाजारपेठेत सोने आणि चांदीच्या किमतींनी घटस्थापनेच्या दिवशी केलेला उच्चांक दुसऱ्या दिवशी मोडीत निघाला. दोन्ही धातुंच्या दरात सकाळी बाजार उघडताच एक हजार रूपयांपेक्षा अधिक वाढ नोंदवली गेली. ग्राहकांसह व्यावसायिकांमध्ये त्यामुळे खळबळ उडाली. सोन्याच्या किमतीमध्ये होणारी वाढ ही मुख्यतः आंतरराष्ट्रीय घडामोडींवर अवलंबून असते.

# दिल्लीत निवृत्त बँकर्सची २३ कोटींची केली फसवणूक

## • ईडी-सीबीआयचे अधिकारी असल्याचं भासवून केली सायबर लूट

**वृत्तसंस्था । नवी दिल्ली**

ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये सध्याच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचं पहायला मिळत आहे. सामान्य माणसांपासून ते सुशिक्षित व्यक्तींपर्यंत अनेकांची सायबर गुन्हेगारांकडून फसवणूक होत असल्याच्या घटना सातत्याने उघडकीस येत आहेत. आता दिल्लीतील एका माजी बँकरची तब्बल २२.९२ कोटींची फसवणूक झाल्याचं प्रकरण समोर आलं आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. ईडी-सीबीआयचे अधिकारी असल्याचं भासवलं आणि माजी बँकरची २२.९२ कोटींची फसवणूक केली.



**सायबर गुन्हेगारांनी कशी केली फसवणूक?**

दक्षिण दिल्लीतील गुलमोहर पार्क भागात राहणाऱ्या ७८ वर्षीय निवृत्त बँक अधिकाऱ्याची फसवणूक करण्यात आली आहे. या गुन्ह्यात सायबर गुन्हेगारांनी या निवृत्त बँक अधिकाऱ्याला तब्बल एक महिनाभर डिजिटल अरेस्ट केलं होतं आणि त्यांनंतर बचत खात्यातील रक्कम उकळली. निवृत्त बँकर नरेश मल्होत्रा हे सहा आठवड्यांपासून त्यांच्या मित्र, कुटुंब आणि शेजाऱ्यांना सर्वसामान्य वाटत नव्हते. त्यांच्या चेहऱ्यावर कायम तणाव जाणवत होता. याच काळात त्यांनी काही बँकांच्या शाखांना भेटी दिल्या. यादरम्यान २१ व्यवहारांमध्ये एकूण २२.९२ कोटी रुपये १६ वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरित करण्यात आले. ज्या बँकेंच्या शाखांमधून **(पान २ वर)**

# सराफी दुकानावर दरोडा टाकण्यासाठी पिस्तूल पळवली

**वृत्तसंस्था । नाशिक**



सराफी दुकानावर दरोडा टाकण्यासाठी एकाने बंदूक दुकानातून पिस्तूल हिसकावून पलायन केल्याचा प्रकार समोर आला आहे. सीसी टिव्ही चित्रणाच्या आधारे माग काढत पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेतले. त्याच्याकडून पिस्तुलीसह लॅपटॉप व भ्रमणध्वनी असा सुमारे एक लाखहून अधिक किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. शहर गुन्हे शाखेच्या युनिट दोन पथकाने ही कामगिरी केली.

अंकुश पारधी (२४, अंजनेरी, मुळेगाव, त्र्यंबकेश्वर) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. या संदर्भात गुरूमितसिंग वधवा **(पान २ वर)**

# जनतेच्या पैशाने सार्वजनिक ठिकाणी नेत्यांचे पुतळे उभारण्यास बंदी

## • सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

**वृत्तसंस्था । चेन्नई**

जनतेच्या पैशांतून सार्वजनिक ठिकाणी नेत्यांचे पुतळे उभारण्यास बंदी घालण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश विक्रम नाथ आणि प्रशांत कुमार मिश्रा यांच्या पीठाने हा महत्त्वाचा निर्णय सोमवारी दिला.

तामिळनाडू सरकारने तामिळनाडूचे माजी दिवंगत मुख्यमंत्री एम. करुणानिधी यांच्या पुतळ्या संदर्भातली एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. त्याबाबत निकाल देताना



सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

तुम्ही जनतेच्या पैशांचा वापर नेत्यांचे पुतळे उभारण्यासाठी का करत आहात? या गोष्टीला संमतीच नाही. असं दोन न्यायाधीशांच्या पीठाने म्हटलं आहे. वरिष्ठ वकील पी. विल्सन यांनी या प्रकरणात तामिळनाडू सरकारची बाजू **(पान २ वर)**

# स्मार्ट प्रीपेड मीटरविरोधात ठाकरेंची शिवसेना आक्रमक

**वृत्तसंस्था । रत्नागिरी**

स्मार्ट प्रीपेड मीटर विरोधात उद्धव ठाकरे यांची शिवसेना आक्रमक होत माजी खासदार विनायक राऊत व उपनेते बाळ माने, संपर्कप्रमुख सहदेव बेटकर, आणि जिल्हाप्रमुख दत्ता कदम यांच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालयावर जनआक्रोश धडक मोर्चा काढला. या मोर्चाला विनायक राऊत यांचे संपर्क कार्यालयापासून सुरुवात करुन महावितरणच्या अधिक्षक अभियंता कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला. यावेळी शिवसैनिक चांगलेच आक्रमक झाले होते. स्मार्ट प्रीपेड मीटर रद्द करण्याची मागणी त्यांनी केली.

# ‘आयटी’मधील तरुणाईच्या हृदयविकार समस्यांत पाच वर्षात वाढ!

**वृत्तसंस्था । मुंबई**

वर्क फ्रॉम होम संस्कृती, सतत स्क्रीनसमोर बसून काम, झोपेचे अयोग्य तास, असंतुलित आहार आणि ताणतणाव या सर्वांचा परिणाम आयटी उद्योगातील तरुण कर्मचाऱ्यांच्या हृदयावर थेट होत आहे. जागतिक हृदय दिनानिमित्त (२९ सप्टेंबर) महाराष्ट्रासह देशभरातील मागील पाच वर्षांची आकडेवारी समोर येताच हे संकट स्पष्ट झाले आहे.

**कर्नाटक आणि महाराष्ट्रातील आयटी हब म्हणजेच बंगळुरू आणि पुणे येथील रुग्णालयांच्या आकडेवारीनुसार मागील पाच वर्षांत आयटी क्षेत्राशी संबंधित हृदयविकाराच्या रुग्णांत तब्बल ६० टक्के वाढ झाली आहे. तर राष्ट्रीय आरोग्य अभियानच्या आकडेवारीनुसार २०१९ ते २०२३ या कालावधीत ३० ते ४५ वयोगटातील आयटी कर्मचाऱ्यांच्या हृदयविकारामुळे आकस्मिक रुग्णप्रवेशांत ४२ टक्क्यांनी वाढ झाली आहे.**

‘इंडियन हार्ट असोसिएशन’च्या अहवालानुसार भारतात हृदयविकाराच्या झटक्यांमुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी तब्बल २५ टक्के मृत्यू ४० वर्षांखालील तरुणांमध्ये होत आहेत आणि त्यात आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

आयसीएमआर-एनसीडी रिसर्च २०२३ च्या माहितीनुसार २०१८ मध्ये तरुण आयटी कर्मचाऱ्यांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण ७ टक्के होते ते वाढून २०२२ मध्ये थेट १३ टक्क्यांवर पोहोचले आहे.

### प्रेमविवाह केल्याने तरुणाचा कोयत्याने वार करुन खून

वृत्तसंस्था । पिंपरी

चिंचवड, बिजलीनगर येथे आठ दिवसांपूर्वी झालेल्या वादातून आणि प्रेमविवाह केल्याच्या रागातून एका तरुणाचा कोयत्याने वार करुन खून करण्यात आला.

वैभव भागवत थोरात (वय २५, रा. नागसेननगर झोपडपट्टी, चिंचवड) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. या प्रकरणात त्याच्या आईने चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांना अटक करण्यात आली असून एका अल्पवयीन मुलाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीच्या मुलाने आरोपीच्या बहिणीबरोबर प्रेमविवाह केला होता. या कारणामुळे आणि आठ दिवसांपूर्वी झालेल्या भांडणामुळे आरोपी चिडून होते.

मंगळवारी दुपारी वैभववर आरोपींनी कोयत्याने हल्ला केला. त्यांनी त्याच्या डोक्यावर, दोन्ही हातांवर, नाकावर, तोंडावर आणि शरीरावर अनेक ठिकाणी वार करून त्याला ठार मारले. चिंचवड पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# जीएसटी बचत उत्सवाला बिहारमध्ये विजयोत्सव बनवण्याचा भाजपचा प्लॅन



## • बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाने विशेष रणनीती आखली

वृत्तसंस्था । मुंबई

**भारतीय जनता पक्ष (भाजप) जीएसटी दरांमधील मोठ्या कपातीचा राजकीय लाभ उठवण्यासाठी देशव्यापी अभियान राबवत आहे. येत्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाने विशेष रणनीती आखली असून, यासाठी निवडक नेत्यांची एक खास टीम तयार केली आहे. बिहारमधील गरिबी रेषेखालील मोठ्या लोकसंख्येला लक्षात घेऊन जीएसटी कपातीचा फायदा जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपने ‘जीएसटी बचत उत्सव’ या नावाखाली विशेष मोहीम हाती घेतली आहे. यात पक्षाला सहयोगी पक्ष जनता दल युनायटेड (जेडीयू) चेही सहकार्य मिळण्याची शक्यता आहे.**

**बिहारसाठी विशेष अभियान**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या तारखा पुढील महिन्याच्या सुरुवातीला जाहीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भाजपने बिहारसाठी ‘जीएसटी बचत उत्सव’ अंतर्गत एक खास रणनीती तयार केली आहे. पक्षाने यासाठी पाच नेत्यांची एक विशेष टीम तयार केली असून, या मोहिमेचे नेतृत्व भाजपचे आमदार संजीव चौरसिया यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. या टीममध्ये सुरेश रूंगटा, अमृता भूषण, मनन मिश्रा आणि नितीन अभिषेक यांच्यासह-संयोजक म्हणून समावेश आहे. ही टीम जीएसटी कपातीमुळे सर्वसामान्यांना होणाऱ्या फायद्यांबाबत जनजागृती करेल.

**बीपीएल कुटुंबांवर लक्ष**

बिहारमधील ३४.१३ टक्के लोकसंख्या गरिबी रेषेखालील (बीपीएल) कुटुंबांमध्ये येते. या वर्गाला जीएसटी कपातीमुळे होणाऱ्या लाभाची माहिती देण्यासाठी पक्षाने विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही जीएसटी दरांमधील सुधारणांचे स्वागत करत पंतप्रधानांचे आभार मानले असून, याचा फायदा राज्यातील प्रत्येक वर्गाला होईल, असे म्हटले आहे.

**राष्ट्रीय स्तरावरही मोहीम**

भाजपने राष्ट्रीय स्तरावरही ‘जीएसटी बचत उत्सव’ मोहीम सुरू केली आहे. यासाठी १० नेत्यांची एक विशेष टीम स्थापन करण्यात आली आहे, ज्यामध्ये पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अरुण सिंह आणि वरिष्ठ नेते तरुण चुघ यांच्यासह आठ अन्य नेत्यांचा समावेश आहे. प्रत्येक नेत्याला तीन ते पाच राज्यांची जबाबदारी **(पान २ वर)**

## संपादकीय

### शारदोत्सव

सर्वांचा आवडता उत्सव असलेल्या शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ होत आहे. नुकत्याच पार पडलेल्या गणेशोत्सवानंतर त्याच उत्साहामध्ये आता नवरात्रात शक्तीदेवतेचेही स्वागत केले जाणार आहे. भारतीय समाज मुळातच उत्सवप्रिय आहे. अशा प्रकारच्या उत्सवाच्या निमित्ताने समाजाचे एकत्रीकरण होते आणि एक सकारात्मक भावना तयार होते. शारदीय नवरात्र स्त्रीशक्तीचा सन्मान करणारा उत्सव मानला जातो. नवरात्राच्या सर्व दिवशी स्त्रीशक्तीचा जागर केला जातो. समाजाला विविध कारणांनी त्रस्त करून सोडणार्या असुरांना यमसदनी पाठवून आदर्श राज्यव्यवस्था निर्माण करणार्या विविध शक्तीदेवतांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच दीर्घकाळापासून शारदीय नवरात्र उत्सव साजरा केला जातो.यानिमित्ताने एक वेगळ्या प्रकारची शक्ती आणि ऊर्जा समाजात तयार होते. सध्याच्या काळात समाजात सर्वत्र एक प्रकारचे अविश्वासाचे आणि विद्वेषाचे वातावरण तयार होत असताना शक्तीदेवतेने पुन्हा एकदा अवतार घेऊन समाजात सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करावे अशी अपेक्षा जर या स्त्रीशक्तीच्या भक्तांनी व्यक्त केली असेल तर त्यात नवल नाही. आधुनिक काळामध्येसुद्धा विविध प्रकारचे असुर पोसले जात आहेत आणि नव्याने तयार केले जात आहेत. आपल्या पद्धतीच्या विघटनवादी किंवा द्वेष पसरवणार्या विचारांचे अनेक लोक तयार करून समाजात विघटन माजवण्याचे प्रयत्नही या आधुनिक असुरांच्या माध्यमातून केले जातात.भारतीय समाज समरसतेसाठी आणि विविधतेतून एकतेसाठी प्रसिद्ध आहे. त्या भारतीय समाजाची वीण काही कारणांनी बिघडून चालल्याची उदाहरणे सातत्याने समोर येत आहेत. गणेशोत्सव असो किंवा शारदोत्सव असो अशा प्रकारचे उत्सव समाजाला एकत्र करण्यासाठी साजरे केले जातात. पण ज्या प्रकारे गेल्या काही वर्षांपासून भारतात, महाराष्ट्रात आणि इतर काही राज्यांमध्ये धर्म आणि जातीच्या आधारे उत्सव आणि महापुरुषसुद्धा विभागले जाऊ लागले आहेत ते पाहता या विस्कटलेल्या समाजाची घडी पुन्हा व्यवस्थित बसवण्यासाठी दुर्गादेवतेला पुन्हा अवतार घ्यावा लागेल असे दिसते.शेकडो वर्षांपूर्वी संत एकनाथांनी आपल्या भारुडाच्या माध्यमातून ङ्गदार उघड बये दार उघडफ अशी विनवणी करून अत्याचाराने त्रस्त झालेल्या समाजाला वाचवण्याचे साकडे घातले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अस्तित्वाच्या आणि पराक्रमाच्या निमित्ताने संत एकनाथांची ही मागणी मान्य झाली आणि मराठी समाज आपल्या राजाच्या छत्र छायेखाली सुखाने जगू लागला. आता इतक्या वर्षांनंतर पुन्हा एकदा संत एकनाथांच्या चालीवर ङ्गदार उघड बये दार उघडफ असे म्हणायची वेळ आली आहे. सध्या समाजात सर्वत्रच विनाकारण अविश्वासाचे, संशयाचे आणि भीतीचे वातावरण तयार करण्याचे प्रयत्न केले जात आहेत किंवा प्रत्येक समूह जातीत आणि धर्मामध्ये विभागला जाऊन आपली सुरक्षा अशा विभागणीमध्येच आहे असे समजू लागला आहे.आपल्या समाजाचा आजवरचा इतिहास पाहता ही गोष्ट निश्चितच भूषणावह नाही. साहजिकच या उत्सवांच्या निमित्ताने का होईना सत्ताधारी किंवा विरोधी राजकारणी नेते, समाजकारणी किंवा शिक्षण तज्ज्ञ यांनी पुढे येऊन भारतीय समाजाची ही बिघडू पाहणारी घडी दुरुस्त करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. कोणताही उत्सव साजरा करण्याचा मुख्य हेतू समाजाला एकत्र करणे आणि एकसंध ठेवणे हाच असतो. पण दुर्दैवाने अशा प्रकारच्या उत्सवांच्या माध्यमातूनच जेव्हा समाजाच्या विघटनाची प्रक्रिया सुरू होते तेव्हा मात्र चिंता वाटू लागते. अशा प्रकारचे उत्सव शांततेने पार पडले तर पोलीस प्रशासन आणि सामान्य प्रशासनसुद्धा सुटकेचा निःश्वास सोडते. कारण अशा उत्सवांमध्येच समाजकंटकांना समाजात दुही निर्माण करण्याची संधी मिळू शकते. शारदीय नवरात्रोत्सवात ज्या शक्तीचा जागर केला जातो त्या शक्तीने नेहमीच समाजकंटकांना संपवण्याचे काम केले आहे.

# जिल्ह्यातील ९ हजार ग्राहक करताय वीजनिर्मिती

## ● पीएम-सूर्यघर योजनेत बसवले ३३.९७ मेगावॅटचे सौरऊर्जा संच

**प्रतिनिधी । धुळे**

**प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत धुळे जिल्ह्यातील ९ हजार २५४ ग्राहक छतावर सौर ऊर्जा संच बसवून वीजनिर्मिती करत आहेत. त्यांची स्थापित क्षमता ३३.९७ मेगावॅट आहे. ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान असलेल्या या योजनेत ग्राहकांना वीजबिल जवळपास शून्य करणे शक्य आहे. त्यामुळे जास्तीत जास्त ग्राहकांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी यांनी केले आहे.**



दरमाह तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे, यासाठी केंद्र सरकारने फेब्रुवारी-२०२४ मध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केलेली आहे. घराच्या छतावर १ ते ३ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांना दरमहा सुमारे १२० ते ३६० युनिट वीज मोफत मिळविण्याची संधी या योजनेत मिळत आहे. त्यामुळे या योजनेस जिल्ह्यात वीजग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

घरगुती वीज ग्राहकांना छतावर सौर ऊर्जानिर्मिती संच बसवता यावा यासाठी विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदराने कर्जाची सोय उपलब्ध आहे. तसेच कर्जाची प्रक्रियाही सुलभ करण्यात आली आहे. या योजनेचा लाभघेण्यास ग्रामीण ग्राहकांना मेळाव्यांद्वारे प्रोत्साहन देण्यात येत आहे. याबरोबरच महावितरणकडून १० किलोवॅटपर्यंतच्या अर्जांना ऑनलाईन पोर्टलद्वारे स्वयंचलित मंजूरी देण्यात येत आहे तसेच सौर नेटमीटरदेखील महावितरणकडून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या योजनेत कार्यान्वित झालेल्या सौर प्रकल्पांतून निर्माण झालेली वीज संबंधित ग्राहकांना दिवसा वापरता येते. शिवाय ग्राहकाची गरज भागवून वीज शिल्लक राहिल्यास महावितरणकडून ती संबंधित ग्राहकांच्या वीजबिलात समायोजित केली जात आहे. छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून घरगुती वीजग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट आणि त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान थेट मिळत आहे. ३०० युनिटपर्यंत मासिक वीजवापर असणाऱ्या घरगुती वीजग्राहकांसाठी ही योजना अतिशय उपयुक्त आहे. तसेच सुमारे २५ वर्षे या सौर प्रकल्पांतून घरातील वीजवापरासाठी मोफत वीज उपलब्ध होणार आहे.

पीएम-सूर्यघर योजनेच्या संकेतस्थळावर नोंदणी केल्यानंतर प्रकल्प उभारण्यासाठी ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार विक्रेता निवडता येतो. प्रकल्प उभारल्यानंतर अनुदान थेट ग्राहकांच्या खात्यात जमा केले जाते. वीज ग्राहकांना https://www.pmsuryaghar. gov.in या संकेत स्थळावर योजनेची सर्व माहिती उपलब्ध आहे. तसेच महावितरणच्या वेबसाईटवरील अक्षय ऊर्जा पोर्टलवरही अधिक माहिती व अर्ज करण्याची सुविधा देण्यात आली आहे.

> ● पीएम-सूर्यघर योजनेत सौर ऊर्जा संच बसवणाऱ्या ग्राहकांना जवळपास मोफत वीज मिळत आहे. शासनाकडून अनुदान मिळणाऱ्या या योजनेचा घरगुती ग्राहक व निवासी संकुलांनी लाभ घ्यावा. महावितरणकडून यासंबंधीच्या सर्व प्रकिया ऑनलाईन व सुलभ करण्यात आली आहे.
>
> **- आय.ए. मुलाणी,**
> मुख्य अभियंता, महावितरण

## रेल्वेगेट बंदमुळे ग्रामस्थांचा रेल्वे अधिकाऱ्यांना घेराव

**प्रतिनिधी । नवापूर**

तालुक्यातील चिंचपाडा गावातील रेल्वे गेट क्रमांक ७४ आजपासून रेल्वे प्रशासनाने कायमस्वरूपी बंद केला आहे. रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाला ग्रामस्थांनी जोरदार विरोध दर्शविण्यात आला. गेट बंद करण्याचे काम सुरू करण्यासाठी आलेल्या रेल्वे अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना गावातील ग्रामस्थांनी एकत्र येत घेराव घातला. अचानक सुरू झालेल्या या कारवाईमुळे ग्रामस्थ संतप्त झाले. हे गेट गावातील शाळकरी मुलांसाठी तसेच नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीसाठी महत्त्वाचा असल्याने बंद झाल्यास मोठी अडचण निर्माण होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. रेल्वे प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता काम हाती घेतल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला. ग्रामस्थांची ठाम मागणी आहे की, गेट कायमस्वरूपी बंद करण्यापूर्वी नागरिकांच्या सोयीचा पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावा. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला. परिस्थिती चिघळत असल्याचे पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली व ग्रामस्थ तसेच रेल्वे प्रशासनाशी चर्चा केली.

## अपघातग्रस्त वाहनात दारू

**प्रतिनिधी । नंदुरबार**

अपघातग्रस्त पिकअप वाहनात ७६ हजार ९५० रुपयांचा दारूसाठा आढळल्याने मोलगी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाडीबार, ता. अक्कलकुवा शिवारात पिकअप वाहनाचा (क्रमांक एमएच १८ एए २३८५) अपघात झाला.

वाहनात ७६ हजार ९५० रुपयांचा दारूसाठा आढळून आला. याबाबत हवालदार वनसिंग भोंग्या पाडवी यांनी मोलगी पोलिसात फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा दारूचा साठा कुणाचा होता, कुठे जात होता, याबाबत चौकशी केली जात आहे.

गुन्ह्याचा तपास हवालदार दिलीप चौरे करीत आहे.

## रेशनच्या धान्यात उंदराच्या लेंड्या, ग्रामस्थांचा संताप

**प्रतिनिधी । साक्री**

तालुक्यातील उंभरे येथील बचत गटामार्फत चालविण्यात येणाऱ्या रेशन दुकानातील धान्यात उंदराच्या लेंड्या आढळल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. याबाबत पुरवठा अधिकाऱ्यांना जाब विचारत चौकशीची मागणी केली.



या रेशन दुकानामधील मिळणाऱ्या धान्यात उंदराच्या लेंड्या मोठ्या प्रमाणात आढळून आल्याने या विषयावर ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तलाठी, ग्रामसेवक, तंटामुक्ती अध्यक्षांसह ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी पुरवठा अधिकाऱ्यांसमोर रेशन वेळेवर मिळत नसल्याबाबत व धान्यामध्ये उंदीर लेंड्या आढळून येत असल्याने ग्रामस्थांच्या जिवीतास मोठा धोका होण्याची शक्यता असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यानंतर पुरवठा अधिकाऱ्यांसह सर्वच जण रेशन दुकानात पोहोचले. यावेळी रेशन दुकानांमध्ये धान्यसाठा न वाटताच पडून असल्याचे आढळून आले. तसेच या धान्यसाठ्यामध्ये उंदरांच्या लेंड्या मोठ्या प्रमाणात दिसून आल्या. पुरवठा अधिकाऱ्यांसमोरच गावकऱ्यांनी संताप व्यक्त करीत या प्रकरणाची चौकशी करून यापुढे शुध्द धान्य पुरवठा करावा, अशी मागणी केली. तंटामुक्ती अध्यक्ष किरण शेवाळे यांना गावकरी वेळोवेळी तक्रार करीत होते. परंतु आज नेमकी ग्रामसभा असल्याने सर्व अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी हा प्रश्न उपस्थित झाल्यावर सर्व गावकऱ्यांनी संताप व्यक्त केला.

यावेळी माधवराव शेवाळे, गंगाधर शेवाळे, संजय देवरे, भीमराव अहिरे, भाऊराव अहिरे, रवींद्र सोनवणे, तुळशीदास अहिरे, विजय सोनवणे, नंदु सोनवणे, प्रविण अहिरे, शांताराम शेवाळे, राकेश शेवाळे, सुभाष शेवाळे, अनिल सोनवणे उपस्थित होते.

## नरडाणा-बाभळे एमआयडीसी रस्त्यांची दुरवस्था

**प्रतिनिधी । सिंदखेड**

येथील नरडाणा-बाभळे औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) झोन दोनमधील प्रमुख रस्ता पूर्णपणे खड्यांनी भरला आहे, ज्यामुळे कामगारांना प्रवास करणे अत्यंत त्रासदायक झाले आहे. या रस्त्यावरील प्रचंड खड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला असून, दुचाकीस्वारांना तोल सांभाळणे अवघड झाले आहे. दररोज शेकडो कामगार येथे ये-जा करतात, मात्र खराब रस्त्यांमुळे त्यांचा जीव धोक्यात आला आहे. रात्रीच्या वेळी तर कामगारांची चांगलीच दमछाक होते. औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने नवीन उद्योजक कंपन्या सुरू करण्यास उत्सुक नाहीत, ज्यामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळत नाही. म्हणूनच, एमआयडीसी प्रशासनाने तातडीने रस्त्यांची आणि पथदिव्यांची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## पान १ वरुन

### अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या......

सरकारने केली आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना मदत - शेतकऱ्यांचं जे नुकसान झालं होतं त्याचे पंचनामे करुन मदतीचे आदेश दिले आहेत. ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २ हजार कोटींहून अधिक मदत करण्याचे आदेश दिले आहेत. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पुढच्या आठ ते दहा दिवसांत पैसे जमा होती. अद्यापही हे थांबलेलं नाही. पंचनामे करून मदत करणं हे ऑनगोईंग राहणार आहे. एखाद्या जिल्ह्यात कमी मदत दिसली तरीही ते नंतर वाढणार आहे कारण जशा गोष्टी समोर येत आहेत तशी मदत करणं सुरु आहे. मृत्यू किंवा दुर्दैवी घटना घडल्यास जिल्हाधिकारी स्तरावर मदतीचे आदेश दिले आहेत. पुरामुळे जी घरांची हानी होते त्याबाबतही जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. कुठल्या जिल्ह्यात काय स्थिती आहे ते आम्ही पाहिलं आहे. पालक मंत्र्यांनाही पूरग्रस्त भागांचा दौरा करण्यास सांगितलं आहे. मी देखील काही जिल्ह्यांना भेट देणार आहे. अति पावसामुळे उद्ध्वस्त होणाऱ्या शेतकऱ्याला मदत करण्यावर आमचा भर आहे असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### दिल्लीत निवृत्त बँकर्सची......

एवढे पैसे हस्तांतरित करण्यात आले, त्या बँकेच्या शाखा व्यवस्थापकांना कोणताही संशय आला नाही हे विशेष. सहा आठवड्यांनी केली तक्रार - या निवृत्त बँक अधिकाऱ्याची २२.९२ कोटी रुपयांची फसवणूक होत असताना तक्रार करण्याची हिंमत देखील होत नव्हती. मात्र, त्यानंतर अखेर १९ सप्टेंबर रोजी त्यांनी तक्रार दाखल केली आणि त्याच दिवशी एफआयआर दाखल करण्यात आला. त्यानंतर आता या फसवणुकीच्या प्रकरणात दिल्ली पोलीस सायबर गुन्हेगारांचा शोध घेत आहेत. दिल्ली पोलिसांच्या इंटेलिजन्स फ्यूजन अँड स्ट्रॅटेजिक ऑपरेशन्स शाखेचे आयुक्त रजनीश गुप्ता यांच्या मते अशा डिजिटल अटक प्रकरणात चोरीच्या पैशांच्या अशा घटना धक्कादायक आहेत. याप्रकरणात आम्ही २० वेगवेगळ्या ठिकाणांहून पैसे उकळण्यात आल्याचं पाहिलं आहे. पण या प्रकरणात त्वरित तक्रार करण्याचा सुवर्णकाळ वाया गेला आहे. त्यामुळे आता या गुन्हेगारांना पकडणं अधिक आव्हानात्मक असणार आहे. मल्होत्रा यांनी ४ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत त्यांच्या खात्यांमधील तीन बँक शाखांना एकूण २१ भेटी दिल्या, तसेच १६ बँक खात्यांमध्ये २१ आरटीजीएस ट्रान्सफर केले. यामध्ये तब्बल २२.९२ कोटी रुपयांचे व्यवहार झाले. हे व्यवहार वेगवेगळ्या बँकांमध्ये केले गेले आहेत. सर्वात विशेष म्हणजे हे पैसे उत्तराखंड, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यातील वेगवेगळ्या बँकांच्या शाखेत वळवण्यात आले. यातील ४,२३६ व्यवहारांपैकी एकही व्यवहार नवी दिल्लीतील एकाही बँकेत झालेला नाही.

### सराफी दुकानावर दरोडा......

(श्रीरामपूर, अहिल्यानगर) यांनी तक्रार दिली. वधवा हे नाशिक-पुणे रस्त्यावरील विजय ममता चित्रपट गृहासमोरील सिंग गन हाऊस या बंदूक घर दुकानात व्यवस्थापक म्हणून काम पाहतात. गेल्या रविवारी सायंकाळी ही घटना घडली होती. पिस्तुल खरेदीच्या बहाण्याने संशयित युवक दुकानात आला. वधवा हे त्याला एअर रिव्हॉल्व्हर दाखवत होते. सुमारे ५० हजार रुपयांची ही पिस्तूल बघत असताना संशयिताने वधवा यांच्या हातातून ती हिसकावून पलायन केले. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### जनतेच्या पैशाने सार्वजनिक......

मांडली. विल्सन यांनी सांगितलं की पुतळ्यासाठी ३० लाख रुपये आधीच खर्च झाले आहेत. मात्र सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला की जनतेच्या पैशांतून नेत्यांचे पुतळे उभारु नका. मद्रास उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय सर्वोच्च न्यायालयाने बदलला आहे.

### जीएसटी बचत उत्सवाला......

देण्यात आली आहे. ही टीम जीएसटी कपातीच्या फायद्यांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम करेल. संसद सदस्यांचे पदयात्रा आयोजन: -भाजपने आपल्या सर्व खासदारांना २२ ते २७ सप्टेंबर या सात दिवसांच्या 'जीएसटी बचत उत्सव'मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. पक्षाने रविवारी दिल्लीतील मुख्यालयातून खासदारांना पत्र जारी करून प्रत्येक खासदाराने आपापल्या मतदारसंघात दररोज दोन पदयात्रा काढाव्यात आणि त्यातून दोन बाजारपेठा कव्हर कराव्यात, असे निर्देश दिले आहेत. बिहार निवडणुकीवर परिणामाची अपेक्षा: - बिहारमधील निवडणुकीच्या दृष्टिकोनातून जीएसटी कपातीचा फायदा जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपने हे अभियान तीव्र केले आहे. पक्षाला विश्वास आहे की, या मोहिमेमुळे निवडणुकीत त्यांना राजकीय लाभ मिळेल आणि बिहारात 'जीएसटी बचत उत्सव' हा 'विजयोत्सव' बनेल.

## वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मेंढपाळाच्या ६ मेंढ्या ठार

**प्रतिनिधी । खांडबारा**


धुळे : तालुक्यातील तिसगाव येथे एका मेंढपाळाच्या पशुधनावर वन्यप्राण्याने हल्ला केल्याची दुर्दैवी घटना रविवारी घडली आहे. या हल्ल्यात मेंढपाळाच्या सहा मेंढ्या ठार झाल्या असून, १२ ते १३ इतर जनावरे जखमी झाली आहेत.

दौलत हिरामण पाटील हे मेंढपाळ आपल्या ५५ मेंढ्या, सात शेळ्या, तीन गायी आणि इतर लहान-मोठ्या जनावरांच्या मदतीने उदरनिर्वाह करतात. २१ सप्टेंबर रोजी संध्याकाळी जोरदार पाऊस आल्याने पाटील यांनी आपले पशुधन लवकर गोठ्यात आणले. रात्री नऊ वाजता गोठ्याचे गेट बंद करून ते घरी गेले. मात्र, याच रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन एका वन्यप्राण्याने थेट गोठ्यात शिरून हल्ला केला. या हल्ल्यात पाटील यांच्या सहा मेंढ्यांचा गळा चिरून त्यांना फस्त करण्यात आले, तर कळपातील १२ ते १३ मेंढ्या आणि शेळ्या जखमी झाल्या आहेत. जखमींपैकी आव जनावरांची प्रकृती चिंताजनक असल्यान त्यांच्यावर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून उपचार सुरू आहेत.

या घटनेमुळे पाटील कुटुंबीयांवर मोठे संकट कोसळले असून त्यांना अश्रू अनावर झाले. या नुकसानीच भरपाई मिळावी यासाठी पाटील यांन वनविभागाकडे मदतीची मागणी केल आहे.

## बोधकथा

### त्याग हीच मन:शांती



पांडुरंग कोट्याधीश होता. पण, त्याला मनःशांती नव्हती. तो नेहमी त्या साधुकडे जाई. म्हणे, मला शांती हवीय, महाराज! त्यासाठी काहीतरी साधना शिकवा. महाराज म्हणत, तू पैशाच्या दृष्टीनेच जगाकडे पाहतोस. त्याऐवजी स्वतःकडे पाहायला शिक. पांडुरंग म्हणे, महाराज, पैसा हे माझं सर्वस्व आहे. त्याचा विचार मी कसा सोडू? त्याचे हे मत ऐकून महाराजांनी त्याला एक काच दिली व त्यातून पाहायला सांगितलं. पांडुरंग म्हणाला, यातून तर पलीकडचे जग दिसते. नंतर महाराजांनी तशाच काचेचा बनविलेला आरसा दिला व त्यातून पाहायला सांगितले. पांडुरंग म्हणाला, महाराज! यात तर मीच दिसतो. महाराज म्हणाले, बघ, सध्या काचेतून जग दिसते. पण, त्याच काचेला एका बाजूने लाख/चांदी लावली की, आपण स्वतःला पाहू शकतो. तसेच धन, सत्ता, संपत्तीच्या स्वार्थी काचेतून पाहिले, तर जग तसेच दिसते. पण, हे जग चालविणारी शक्ती जाणायची इच्छा हवी. मी कोणी नाही, अशा निःस्वार्थी भावनेने जगाकडे पाहिले की, आत्मज्ञान होते. शांती लाभते.

**तात्पर्य :- मोह, लोभ आणि हव्यास यांचा त्याग हीच मनःशांतीची सुरुवात.**

## राशिभविष्य

**मेष** : छोट्या गोष्टींवरून नाराज न होता, कामावर लक्ष केंद्रित करा. व्यवसाय चांगला चालेल. पण विरोधकांवर नजर ठेवा. नोकरीत अनुकूल बदल होतील. योगा आणि ध्यान केल्याने तणाव कमी होईल.

**वृषभ** : कुटुंबातील सदस्यांमुळे थोडी व्यस्तता वाढेल. मार्केटिंग आणि पेमेंट मिळवण्यासाठी आजचा दिवस खूप चांगला आहे. तुमच्या प्रयत्नांमुळे सर्व कामे होतील. तसेच नोकरीतही प्रगतीचा योग आहे.

**मिथुन** : शांत आणि संयमित राहून काम केल्यास यश मिळेल. व्यवसायात धीर धरा. कुटुंब आणि प्रियजनांसोबत आनंदी क्षण घालवा. बदलत्या हवामानामुळे आरोग्याची काळजी घ्या.

**कर्क** : आयात-निर्यातीच्या व्यवसायात विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**सिंह** : तुमची गोपनीयता जपून ठेवा. शेजाऱ्यांशी वादापासून दूर राहा. तुमच्या रागावर नियंत्रण ठेवा. नवीन कामाची सुरुवात यशस्वी होईल, आर्थिकदृष्ट्या ते फायदेशीर ठरेल.

**कन्या** : इलेक्ट्रॉनिक वस्तू खराब झाल्याने खर्च वाढेल. प्रतिस्पर्धकांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

**तुळ** : जवळच्या व्यक्तीशी वाद होऊ शकतो, म्हणून शांत राहा. खर्चाकडे लक्ष द्या. व्यावसायिक व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगा, एक छोटीशी चूक मोठे नुकसान देणारी ठरु शकते.

**वृश्चिक** : वृश्चिक राशीच्कोणत्याही नकारात्मक गोष्टींकडे दुर्लक्ष करा. व्यवसायात सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान जाणून घेणे आवश्यक आहे. नोकरीत प्रगतीचे योग आहेत. मोठी डील होऊ शकते.

**धनु** : मार्केटिंग आणि मीडियाशी संबंधित कामांमध्ये यश मिळणार नाही. कुटुंबात गैरसमज होण्याची शक्यता आहे.

**मकर** : विद्यार्थ्यांना चांगले परिणाम मिळतील. कुटुंबाशी चांगले संबंध ठेवा. मालमत्तेच्या वादापासून दूर राहा. व्यवसायात खूप काम असेल. पण त्याचे चांगले परिणाम मिळतील.

**कुंभ** : आर्थिक चिंता असू शकते. व्यवसायात थोडेसे बदल करणे आवश्यक आहे. तुमच्या कोणत्याही समस्येसाठी जीवनसाथीचा सल्ला खूप फायदेशीर ठरेल.

**मीन** : कौटुंबिक व्यवसायात यश मिळेल, पण नवीन काम सुरू करण्यासाठी हा काळ अनुकूल नाही.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक - राजेंद्र राधाकिसन शर्मा (मोबा. - ९४२२७८४३३६)** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### माहिती अधिकार दिन २९ रोजी होणार साजरा

**जळगाव ।** सामान्य जनतेमध्ये माहिती अधिकाराबाबत जनजागृती होण्यासाठी २८ सप्टेंबर हा दिवस सर्वत्र माहिती अधिकार दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. परंतु २०२५ चा माहिती अधिकार दिन हा शासकीय सुट्टीच्या दिवशी म्हणजे रविवारी येत असल्याने, यंदा सोमवार २९ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात माहिती अधिकार दिन साजरा करण्यात येणार असल्याचे जिल्हा प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, समाजसेवी संस्था व इच्छुक गटांच्या माध्यमातून भित्तिपत्र स्पर्धा, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, चर्चासत्रे व व्याख्यानमाला आयोजित कराव्यात या उपक्रमांच्या पारितोषिकांची व्यवस्था लॉयन्स क्लब, रोटरी क्लब अशा विविध समाजसेवी संस्थांच्या सहयोगाने करण्यात यावी, असेही प्रसिद्धीपत्रकांद्वारे कळविले आहे.

### महिला सहकारी मंडळाची २७ ला सभा

**जळगाव ।** महिला सहकारी मंडळाची ७९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. २७ रोजी दुपारी ४.३० वाजता मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रतिमा अत्रे राहणार असून सभेत मागील वर्षाच्या कामकाजाचा आढावा आणि आर्थिक उलाढाल यांचा सविस्तर लेखाजोखा सादर केला जाणार आहे. सभासदांनी या वार्षिक सभेत मोठ्या संख्येने उपस्थित असे आवाहन सेक्रेटरी शांता वाणी यांनी केले आहे. सहकारी तत्वावर चालविली जाणारी महिलांची एक जुनी आणि प्रतिष्ठित संस्था आहे, जी उद्योजक व कार्यकुशल महिलांना संधी उपलब्ध करून देते. सध्या या संस्थेत सुमारे ३०० सभासद आहेत.

### तंत्रनिकेतनमध्ये पार पडले योग शिबीर

**जळगाव ।** शासकीय तंत्रनिकेतन मुलींचे वसतिगृहात एनएसएसच्या माध्यमातून मू. जे. महाविद्यालयातील सोहम डिपार्टमेंट ऑफ योग अँड नॅचरोपॅथी यांच्यातर्फे योग शिबिर घेण्यात आले. रजनी मडावी यांनी प्रात्यक्षिक सादर केले. वसतिगृहातील सर्व विद्यार्थीनींनी यात सहभाग घेतला. प्रा.डॉ. देवानंद सोनार, प्रा.डॉ. ज्योती वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा.पंकज खाजबागे, उपप्राचार्य डॉ.प्रसाद चौधरी, कुलमंत्री प्रा.डॉ. संतोष शेळके, प्रा.चैताली पवार, पूनम नेमाडे, रूपाली गोस्वामी, कार्यालयीन अधीक्षक मनीष जाधव, कीर्ती काटे, स्नेहांकिता पाटील, शीतलं वाडेकर, मीनल इंगळे, सुवर्णा क्षीरसागर उपस्थित होते.

# अवैधरित्या होणारी गौणखनिज वाहतूक थांबवा

## ● मनसेची तहसिलदारांकडे निवेदनाद्वारे मागणी; आंदोलन छेडण्याचा दिला इशारा

**प्रतिनिधी । जळगाव**

तालुक्यात अवैधरित्या सुरु असलेली वाळू, मुरुम या गौण खनिजची वाहतुक तात्काळ ५ दिवसाच्या आत थांबविण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे तहसिलदारांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. ५ दिवसाच्या आत गौण खनिजची वाहतुक न थांबविल्यास मनसेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा ईशारा देखील निवेदनातून देण्यात आला आहे.



निवेदनात, तात्काळ महसूल प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांचे पथक रात्र-दिवस बंदोबस्तासाठी थांबविण्यात यावे, जेणेकरुन होत असलेला वाळू उपसाला आळा बसेल. अवैधरित्या होत असलेल्या वाळू उपसामुळे आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या विहीरींची पाण्याची पातळी खाली गेलेली असून अशीच परिस्थीती जर अजून १ ते २ वर्ष राहिली तर भविष्यात सर्व शेतकरी बांधवांना त्यांचे पिकांसाठी पाणीच विहीरींमध्ये राहणार नाही. धानोरा, मोहाडी या गावांना पिण्याचे पाणी येथून पुरविले जाते. सद्या प्रधानमंत्री जलमिशन योजना अंतर्गत त्याठिकाणाहून वरील गावांना पाणी पुरविणेबाबतचे काम सुरु आहे. परंतु त्याठिकाणाहूनच वाळू माफिया हे मोठ्या प्रमाणात वाळूची उचल करीत असल्याने तेथे पाण्याचा साठाच शिल्लक राहणार नाही, तरी संबंधित गावांना पाणी कसे पुरविले जाईल ? हा मोठा गंभीर प्रश्न आहे.

अवैधरित्या मोठ्या डंम्परने होत असलेल्या वाळू वाहतुकीमुळे शेत रस्त्याचे सुध्दा मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. धानोरा गावावरुन जाणारे शाळेकरी विद्यार्थी जळगाव ते धानोरा, मोहाडी या ठिकाणाहून सायकलीने वापरीत असतात. याच रस्त्यावर वाळू वाहतूककेली जात असल्याने अपघात होण्याची देखील शक्यता आहे. वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर नेम प्लेट नसतात. छोटे-मोठे अपघात झाल्यावर देखील संबंधितांविरुध्द काहीएक कारवाई, गुन्हा नोंदविला जात नाही. एखाद्यावेळी वाहन अडविण्यात आले तर संबंधितावर महसूल विभागाचे कर्मचारी हे थातूर-मातूर कारवाई करुन पंचनामा करुन वाहने सोडून देतात. यामुळे यांची मोठ्या प्रमाणावर मुजोरी व दहशत वाढलेली आहे.संबंधित अवैधरित्या वाळू उपसा व गौण खनिज वाहतुक करणाऱ्यांवर तात्काळ ५ दिवसाच्या आत योग्य ती कारवाई करावी. अवैधरित्या होत असलेली वाळू वाहतूक थांबविण्यात न आल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना पाच दिवसानंतर तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडणार असून यादरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास त्याला सर्वस्वी महसूल प्रशासनास जबाबदार राहील, असे नमुद करण्यात आले आहे. निवेदन देतेवेळी महानगराध्यक्ष विनोद शिंदे, उपमहानगराध्यक्ष राजेंद्र निकम, श्रीकृष्ण मेंगडे, प्रकाश जोशी, ललित शर्मा, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील, ॲड.सागर शिंपी, शाखाध्यक्ष अनिता कापुरे, लक्ष्मी भिल यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### ■ महसुल विभागाचे अधिकारी हाताशी...

मनसेतर्फे देण्यात आलेल्या निवेदनात, धानोरा, म्हसावद, आव्हाणे, खेडी आदी गावातून गिरणा नदीच्या पात्रातून अत्याधुनिक साधनसामुग्रीमार्फत वाळू काढण्यात येत असून त्यामुळे नदीचे पात्र हे खोल गेले आहे. नदीपात्रात भरपूर पाणी जमा असल्याने वाळू माफीया इलेक्ट्रॉनिक मशीनच्या सहाय्याने रात्री ९ ते ५ या वेळेमध्ये बेसुमारपणे वाळूचा उपसा करुन त्याची मोठ्या हायवा डम्परच्या सहाय्याने रातोरात वाहतूक करुन विल्हेवाट लावीत असल्याचे नमुद करण्यात आले आहे. हा सर्व गैरप्रकार वाळू माफिया हे संबंधित विभागाचे अधिकारी, तलाठी, मंडळाधिकारी, तहसिलदार, प्रांताधिकारी या सर्वांना हाताशी धरुन राजेरोसपणे करीत असल्याचा आरोप देखील निवेदनात करण्यात आला आहे.

# विवाहितेची सहा वर्षाच्या मुलीसह रेल्वेखाली आत्महत्या

**प्रतिनिधी । जळगाव**

तालुक्यातील नशिराबाद येथील एका विवाहितेने सहा वर्षाच्या मुलीसह धावत्या रेल्वेखाली भादली पुलाजवळ आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. ही घटना सोमवारी सायंकाळी घडली. या प्रकरणी नशिराबाद पोलिसांनी अकस्मात मृत्यू अशी नोंद केली आहे.

मनीषा चंद्रकांत कावळे (वय-२८) आणि गौरी चंद्रकांत कावळे (वय-६) अशी मृतांची नावे आहेत. नशिराबाद येथील भवानी नगर परिसरात मनीषा कावळे या पती चंद्रकांत आणि दोन मुलींसह वास्तव्यास होत्या. चंद्रकांत कावळे हे जळगावमधील औद्योगिक वसाहतीत एका एका चटई निर्मिती कंपनीत रोजंदारीने काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सोमवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास पती घरी असतानाच मनीषा गावातील एका परिचित महिलेकडून रेशनचा तांदूळ आणायचा आहे, असे सांगून लहान मुलगी गौरीला सोबत घेऊन घराबाहेर पडली. मात्र, आई आणि मुलगी सायंकाळ झाली तरी घरी न परतल्याने कावळे कुटुंबियांनी त्यांचा सगळीकडे शोध घेतला. नातेवाईक आणि ओळखीच्या लोकांकडे विचारपूस केली. मात्र, दोघींचा कुठेच तपास लागला नाही.

दरम्यान, मनमाड-भुसावळ रेल्वे मार्गावरील भादली पुलाजवळ एका महिलेचा लहान मुलीसह छिन्नविछीन्न अवस्थेतील मृतदेह आढळल्याची माहिती नशिराबाद पोलिसांना सायंकाळी उशिरा मिळाली. हवालदार रूपेश साळवे खात्री करण्यासाठी सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी पोहोचले. कावळे कुटुंबियांकडून ओळख पटविण्यात आली असता, मृतदेह मनीषा आणि गौरी यांचे असल्याचे दिसून आले. पंचनामा करून दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात रवाना करण्यात आले. मंगळवारी सकाळी उत्तरीय तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. पोलीस निरीक्षक आसाराम मनोरे हे मनीषा कावळे आणि गौरी कावळे यांच्या आत्महत्येच्या कारणांचा तपास करीत आहेत.

# अपघातातील जखमी तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

**प्रतिनिधी । जळगाव**

शहरात सुप्रीम कॉलनी चौकात आज सकाळची घटना जळगाव प्रतिनिधी शहरातील सुप्रीम कॉलनी चौकामध्ये एमआयडीसी परिसरातून जळगाव शहरात मावशीच्या घरी परत असताना अज्ञात भरधाव वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीवरील तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना आज मंगळवार दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास घडली. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



प्रेम उर्फ जयपाल चरणसिंग पाटील (वय-१८, रा. लोंढरी ता.जामनेर, हल्ली मु. एमआयडीसी परिसर, जळगाव) असे मयत तरुणाचे नाव आहे. जयपाल याच्या पश्चात आई, वडील, बहिण असा परिवार आहे. जयपाल याने नुकतेच बारावीचे शिक्षण घेतले होते. तर त्याचे वडील चरणसिंग पाटील हे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वाळूज भागात एमआयडीसी येथे कामगार म्हणून काम करीत आहेत. दरम्यान मंगळवार दि.२३ रोजी सकाळी एमआयडीसी भागातून मावशीच्या घरी परतत असताना जयपाल याच्या दुचाकीला अज्ञात भरधाव वाहनाने जबर धडक दिली. या धडकेत जयपाल हा गंभीर जखमी झाला. त्याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे अतिदक्षता विभागामध्ये उपचार सुरू असताना दुपारी २ वाजेच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. यावेळी जयपाल याच्या परिवाराने मन हेलावणारा आक्रोश केला. घटनेप्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सातत्य असेल तर कोणतेही उच्च धेय्य गाठू शकतो

## ● कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांचे प्रतिपादन; गुणवंतांचा झाला गौरव

**प्रतिनिधी । जळगाव**

कोणतीही गोष्ट मिळवायची असेल तर मेहनत करण्याची तयारी व सातत्य असावे लागते. सातत्य असेल तरच आपण कोणतेही उच्च धेय्य गाठू शकतो, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी केले.



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागात योगशिक्षक पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण आणि गुणवंतांचा गुणगौरव सोहळा नुकताच पार पडला. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ.किशोर पवार, आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेच्या प्रमुख डॉ. मनीषा इंदाणी, इंजि.राजेश पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमात सुरुवातीला योगशिक्षक पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मार्कशीट प्रदान करण्यात आले. त्यानंतर अमर हटकर यांचा क्रीडा विषयातून सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल आणि एकनाथ नन्नवरे यांचा योगशास्त्र विभागात टीचिंग असोसीएट म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल कुलसचिव डॉ. विनोद पाटील व मान्यवरांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी बोलतांना संचालक डॉ. मनीषा इंदाणी यांनी, सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन निरोगी निरामय आरोग्यासाठी अश्या सर्व विद्यार्थ्यांकडून आपण प्रेरणा घेतली पाहिजे, असा आशावाद व्यक्त केला. यावेळी विद्यार्थी व सुरक्षारक्षक उपस्थित होते.

# मनुष्याचे सुख-दु:खाचे चित्रण करण्याची कुशलता कवी, लेखकाचे सामर्थ्य दर्शवते : डॉ.सुनील कुलकर्णी

**प्रतिनिधी । जळगाव**

हिंदी साहित्यातील अनेक कवी मंडळींनी मानवाला जीवन जगण्याचे तत्वज्ञान दिले आहे. सोबतच विविध प्रकारचे कौश्यल्ये सुद्धा सांगितले आहेत. ज्या लेखकाच्या लेखनातून मानवी जीवनाचे विविध अंग प्रामाणिकपणे, समर्थपणे आणि तटस्थपणे प्रकटते, त्यांच्या रचनाकृती लोकप्रिय होतात. मनुष्याचे सुख-दुःख, आशा-आकांशा, दृष्टिकोन, मते-अभिमते, समज याचे चित्रण करण्याची कुशलता, कवी आणि लेखकाचे लेखन सामर्थ्य दर्शवते, असे प्रतिपादन केंद्रीय हिंदी संस्थानचे डॉ.सुनील कुलकर्णी यांनी केले.





मूळजी जेठा महाविद्यालयातील हिंदी विभागाच्यावतीने हिंदी दिनानिमित्त हिंदी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाची सांगता नुकतीच झाली. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव्य विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ.भूपेंद्र केसुर हे होते. यावेळी प्रा.विनोद अहिरे, प्रा.अंकिता दुबे, अतुल तेली, रणजीत आडे, उज्वला पाटील, प्रा.कमलाकर रूगे, डॉ.योगेश पाटील, डॉ.सुभाष महाले, डॉ.संजय रणखांबे, डॉ. राहूल संदानशिव आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ. कुलकर्णी म्हणाले की, हिंदी साहित्यामधील विविध विषयांचे, साहित्य प्रकारांचे, त्यातील सौंदर्य स्थळांचे व्यवस्थित मूल्यांकन झाले पाहिजे. त्यामध्ये प्रकट स्वरूपातील विविध कौशल्यांचा सुद्धा अभ्यास आणि संशोधन झाले पाहिजे. या साहित्यामध्ये उच्चारण कौशल्य, लेखन कौशल्य, श्रवण कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य आणि व्यवहार कौशल्य इत्यादी कौशल्यांचा कुठे ना कुठे संदर्भ आला आहे. यासाठी संत साहित्य, आधुनिक काळातील साहित्य मार्गदर्शक ठरेल, असेही ते यावेळी म्हणाले. प्रास्तविक डॉ. रोशनी पवार यांनी तर सूत्रसंचालन डॉ.विजय लोहार यांनी केले. आभार डॉ.मनोज महाजन यांनी मानले.

# संघटन वाढीसाठी सर्वांनी प्रयत्न करावे!

## ● बामसेफ, सहयोगी संघटनांच्या बैठकीत मान्यवरांचे आवाहन

**प्रतिनिधी । जळगाव**

बामसेफ, बुध्दिष्ट इंटरनॅशनल नेटवर्क, बीएमपी व सहयोगी संघटनांची बैठक नुकतीच पार पडली. बैठकीत संघटन वाढ व विस्तार, आगामी काळात होणारे सहयोगी संघटनांचे राष्ट्रीय व राज्य अधिवेशन आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी संघटन वाढीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन मान्यवरांनी केले.



बामसेफच्या कार्यालयात राज्य कार्याध्यक्ष सुमित्र अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. बैठकीला दिलीप इंगळे, दिलीप सपकाळे, प्रविण बैसाणे, राहुल अहिरे, प्रा.आर. जी. सपकाळे, अवीनाश वानखेडे, निलेश सपकाळे, सलीम तडवी, ॲड.आनंद कोचुरे, युवराज बनसोडे, शैलेश नन्नवरे, राहुल मोरे, गोविंदा इंगळे, घनशाम वाडे, खुशाल सोनवणे, संजीव सोनवणे, विशाल सोनवणे, आनंदा निकम, लंकापती भालेराव, पराग कोचुरे, नितीन अहिरे, मुकेश सावकारे, राजेंद्र डोळे, सुभाष सोनवणे, प्रकाश सोनवणे, योगेश सोनवणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रास्ताविक बीएमपीचे जिल्हाध्यक्ष सुनिल देहडे यांनी तर सुत्रसंचलन बुध्दिष्ट इंटरनॅशनल नेटवर्कचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रकाश कांबळे यांनी केले. आभार बामसेफचे तालुका कार्याध्यक्ष सुभाष नरवाडे यांनी मानले.



## नवरात्रोत्सव : या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।



प्रबोधननगर नवदुर्गा मित्र मंडळ



जय बालाजी मित्र मंडळ, चौघुले प्लॉट



शिवनेरी मित्र मंडळ, चौघुले प्लॉट





साईकृपा एकता मित्र मंडळ



श्री सप्तशृंगी एकता मित्र मंडळ

# एरंडोल शहरातील अंजनी नदीला महापूर

## ● आपतीग्रस्त भागाची ना. महाजन, खा. वाघ, आ. अमोल पाटील यांच्याकडून पाहणी

**प्रतिनिधी । एरंडोल**

**संततधार पावसामुळे तालुक्यातील अनेक ग्रामीण भागात ढगफुटी झाली. त्यामुळे कासोदा, उत्राण या परिसरातील ग्रामीण भागात प्रचंड नुकसान झाले आहे. तर अंजनी मध्यम प्रकल्पात नदीक्षेत्रातील गावांना व पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाल्याने शहराला पुराचे पाणी शहरातील काही भागांमध्ये शिरले. त्यामुळे अनेक किरकोळ विक्रेत्यांचे दुकानात पाणी घुसल्याने नुकसान झाले आहे.**





सोनबडी या गावाला पुराचे पाणी घुसल्याने पंचवीस तीस कुटुंबातील जवळपास ८० नागरिकांचे जीव धोक्यात आले आहे. आ. अमोल पाटील यांच्या प्रयत्नांनी तत्परता दाखवून अधिकाऱ्यांना सूचना केल्या. सदर नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.

जलसंपदामंत्री गिरीश महाजन खासदार स्मिता वाघ, आ.अमोल पाटील, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांनी एरंडोल शहराला भेटी देऊन माहिती जाणून घेतली. शहरासह तालुक्यातील शेतकऱ्यांसह नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. शहरासह तालुक्यातील ढगफुटी व मुसळधार पावसात झालेल्या नुकसानीबाबत माहिती जाणून घेतली

एरंडोल तालुक्यातील उत्राण, भातखेडे, निपाणे, तळई, कासोदा यासह अनेक गावांना ढगफुटी सारखा मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे अनेकांच्या घरात पाणी घुसले. खरीप हंगाम जमीन दोस्त झाले. घरात घुसलेल्या पावसामुळे जीवन आवश्यक वस्तू पाण्यात वाहून गेले. तसेच तालुक्यातून अनेक ग्रामीण भागात काल झालेल्या पावसामुळे सर्व जनजीवन विस्कळीत झाले होते. तर एरंडोल शहरातील अंजनी नदीला आलेल्या पुरातून संपूर्ण शहराला खास करून नदीकाठच्या भागाला पुराने वेढले होते. या पुरामुळे शहराला लागून असलेले म्हसावद रस्ता, कासोदा रस्ता, अंजनी नदीच्या पुलावरून पाणी वाहत होते. त्यामुळे सदरचे रहदारीचे मार्ग बंद करण्यात आले होते. शहरातील नदीकाठच्या नागरिकांना घर सोडून दुसरीकडे स्थलांतरित करण्यात आले होते. त्यात नदीकाठच्या नागरिकांचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. सन २०१५ आणि सन २०१६ नंतर अंजनी नदीला एवढा मोठा प्रथमच पूर आला.बुधवार दरवाजा, मरी माता मंदिर परिसर व शहरातील काही भागातील दुकानांमध्ये व घरांमध्ये पाणी शिरल्याचे चित्र होते.

### पावसामुळे अनेक घरांमध्ये शिरले पाणी; पिकांचे प्रचंड नुकसान

मुसळधार पावसामुळे उत्राण गावाला नदीचे स्वरूप आले होते. ढगफुटी सारख्या झालेल्या या पावसामुळे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले. नदीकाठी गावातील अनेक घरात व दुकानात पाणी साचून संसार उपयोगी साहित्य वाहून गेले. अचानक आलेल्या या पावसामुळे लोकांना साहित्य बाहेर काढण्यासाठी वेळ मिळाला नाही. गावात अनेक घरांची पडझड झाली असून अनेक दुकानांमध्ये पाणी साचून दुकानांच्या मालाची नासधूस झाली आहे. शेतांना तळ्याचे स्वरूप तर नाले नदीच्या स्वरूपात वाहू लागले आहे. शेतामध्ये तलाव असल्याप्रमाणे पाणी साचले तर शेताच्या भोवती असणाऱ्या चाऱ्याना नदीचे स्वरूप आले होते. या पावसामुळे सर्व पिकांना नुकसानीचा फटका बसला आहे. शासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना सहाय्य करण्याची मागणी होत आहे.

# नगरदेवळा परिसरात पावसाची संततधार, अग्नावती नदीला पूर



**प्रतिनिधी । पाचोरा**

तालुक्यातील नगरदेवळा व परिसरात विजांच्या कडकडाटा सह रविवारी रात्रीपासून पावसाची संततधार सुरु असल्याने अंग्नावती नदीला पूर आल्याने सोमवारचा आठवडे बाजाराचे नियोजन विस्कळीत झाले होते. नगरदेवळा व परिसरात आतापर्यंत पाऊस सुरूच सुरु होता. नागरीकांनी घाबरून न जाता आपपल्या घरात सुरक्षित राहवे. नदी काठच्या नागरिकांनी सुरक्षित स्थळी जावे. आपले गुरे, ढोरे नदीकाठावर असतील तर त्यांना सुरक्षित ठिकाणी बांधावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

**सतर्कतेचा इशारा**

दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मन्याड धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये कालपासुन सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे मन्याड धरणाच्या पाणी पातळीत वेगाने वाढ होत असून मन्याड धरणावरील पाणलोट क्षेत्रामधील हातगाव लपा, राजदेहरे लपा, देश नाला, स्थानिक नाले, पाझर तलाव यांचा विसर्ग असे अंदाजे १४००० ते १५००० क्युसेक्स विसर्ग पाणी मन्याड धरणात तसेच सांडव्यावरून नदीत सुरू आहे. नदी काठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## थोडक्यात

### गायत्री शक्तिपीठमध्ये सामूहिक श्राध्द तर्पण

**भुसावळ ।** परिवारच्या अखिल विश्व गायत्री तत्वावधानमध्ये गायत्री शक्तिपीठ भुसावळ येथे सर्वपित्री अमावास्या दिवशी रविवार दि.२१ रोजी सामूहिक श्राद्ध तर्पण भवनापूर्ण झाले. हिंदू धर्मात पितृपक्षात तिथीनुसार आपल्या पूर्वजांचे स्मरण करून श्राद्ध तर्पण करण्याची परंपरा आहे. सर्वपित्री अमावस्येलाही अनन्य महत्व आहे. रविवारी सर्व परिजनांनी आपल्या पूर्वजांना जलतर्पण करून त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना केली.

### गोरनाळे येथे सेवा पंधरवडानिमित्त वृक्षारोपण

**जामनेर ।** तालुक्यातील गोरनाळे येथे ग्रामपंचायतमार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा राबविला जात आहे. ग्रामपंचायत गोरनाळे यांच्यामार्फत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी रांजणी सजेच्या ग्राममहसूल अधिकारी माधुरी वेरूळकर, लोकनियुक्त सरपंच चंद्रकलाबाई सीताराम वाघ, उपसरपंच मंगल कांबळे, भागवत पारधी, मोहन वाघ, रवींद्र कांबळे यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

# पुष्पवृष्टीने संत मुक्ताईचा जागर

**प्रतिनिधी । मुक्ताईनगर**

संत मुक्ताई संस्थान व श्री.स्वामी समर्थ सेवेकरी परिवारातर्फे आयोजित कार्यक्रमात हजारो भाविकांनी केले श्री दुर्गा सप्तशती, संत मुक्ताई विजय ग्रंथाचे पारायण व पुष्पवृष्टीने संत मुक्ताईचा जागर केला.



हिंदू धर्मातील अतिशय महत्त्वाचा व प्रत्येक कुटुंबासाठी अतिशय श्रद्धेचा असलेला नवत्रोत्सव सण उत्सवास दि.२२ सप्टेंबरपासून सुरुवात झालेली आहे.नवरात्रीच्या पहिल्या माळेचे आई साहेबांचा ७४६ वा जन्मसोहळ्याचे औचित्य साधून तापी पूर्णा परिसर श्री स्वामी समर्थ सेवेकरी परिवारातर्फे हजारोंच्या संख्येत उपस्थित राहून सकाळी १०:३० ते दुपारी १ वाजेच्या दरम्यान मोठ्या उत्साहात श्री दुर्गा सप्तशती पारायण, संत मुक्ताई विजय ग्रंथ पारायण सोहळा, आई साहेबांच्या जन्मोत्सव दु.१२ वाजता, पुष्पवृष्टी व नाम गजर करून आई साहेब मुक्ताई यांचा जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. या पारायण सोहळ्याने मुक्ताई मंदिर परिसरात नवचैतन्य पसरले होते. श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे मार्गदर्शक परम पूज्य गुरुमाऊली श्री अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात येथे पारायण सोहळा पार पडला. संस्थानचे अध्यक्ष ॲड. रविंद्र पाटील, केंद्रीय क्रिडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षाताई खडसे, डॉ. जगदीश पाटील, शिवसेना महिला आघाडीच्या संजना पाटील, संत मुक्ताई पालखी सोहळा प्रमुख रवींद्र हरणे महाराज, विशाल खोले महाराज, नितीन महाराज, पंकज महाराज, दीपक महाराज, लखन महाराज, दुर्गाताई संतोष मराठे महाराज, अमोल महाराज, लिलाधर पाटोळे, निवृत्ती पाटील, पुरुषोत्तम वंजारी उपस्थित होते.



# साकेगावातील युवकाचा वाघूर नदीत बुडून मृत्यू

**प्रतिनिधी । भुसावळ**

तालुक्यातील साकेगाव शिवारात वाघुर नदीत पाण्यात पाय घसरून पडल्याने साकेगाव येथील ३२ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. लक्ष्मण वसंत ठाकरे (३२, रा.श्रीराम चौक, सिंगार बर्डी, साकेगाव, ता. भुसावळ) असे मृत तरुणाचे नाव आहे.

शनिवार, दि.२० सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास लक्ष्मण ठाकरे हे म्हशी चारण्यासाठी वाघुर नदीपात्राजवळ गेला व जुन्या हायवे पुलावरून जात असताना त्याचा पाय घसरला व तो नदीत पडला. पाण्याच्या प्रवाहामुळे वाहून जावून त्याचा मृत्यू झाला.

# गरीब बालकांच्या चेहऱ्यावरील आनंद लाख मोलाचा : गुणवंतराव पाटील

**प्रतिनिधी । पारोळा**

जिल्हा परिषदेच्या गोरगरीब बालकांना न मिळणाऱ्या शैक्षणिक वस्तू जेव्हा समाजातील दाते भेट म्हणून उपलब्ध करून देतात तेव्हा त्यांना होणारा आनंद व त्यांच्या चेहऱ्यावर फुलणारे हास्य हे लाख मोलाचे समाधान देते, असे प्रतिपाद निवृत्त मुख्याध्यापक गुणवंतराव पाटील यांनी दप्तर वाटप कार्यक्रमात केले.

कासार समाज अध्यक्ष पारोळा तथा श्री बालाजी मंदिर विश्वस्त संजय विठ्ठल कासार यांचे पुतणे व स्व प्रमोद शेठ विठ्ठल शेठ कासार पारोळा यांचे सुपुत्र शुभम प्रमोद कासार यांचे चिरंजीव चि तन्मय उर्फ राम याच्या द्वितिय वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रं ३ पारोळा येथे ३० विद्यार्थ्यांना छान सुंदर टिकावु दप्तर वाटप करण्यात आले. या उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त मुख्याध्यापक गुणवंतराव पाटील तर प्रमुख पाहुणे माधवराव शिंपी, संजय कासार, ऋतुजा कासार, वरद कासार उपस्थित होते. मुख्याध्यापक मनवंतराव साळुंखे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी माधवराव शिंपी यांनी सरोदे-कासार परिवाराचा धार्मिक व सेवाभाव याचे कौतुक केले.

# शिक्षकच समाजाचे खरे शिल्पकार : विश्वनाथ पाटील

**प्रतिनिधी । भुसावळ**

उत्कृष्ट काम करणारे शिक्षक हे समाजाचे खरे शिल्पकार आहेत. विद्यार्थ्यांवर अपार प्रेम करून गावाशी नाळ जपणाऱ्या या शिक्षकांचा सन्मान म्हणजे ज्ञानदेवतेच्या उपासनेचा खरा मान आहे. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान अपूर्व आहे. असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी गटनेते विश्वनाथ पाटील यांनी केले.



तालुक्यातील कुऱ्हा पानाचे येथील आई प्रतिष्ठान यांच्याकडून आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले.त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी जि.प. सदस्य समाधान पवार यांनी भूषवले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ नाट्यकर्मी व माजी उपसरपंच डॉ.टी.टी.बारी, सरपंच दुर्गाबाई शिंदे, माजी सरपंच सुरेश शिंदे, दूध डेअरीचे चेअरमन रवींद्र गांधेले, हायस्कूलचे चेअरमन एकनाथ बडगुजर, जी.के. पाटील, लहानू पाटील, भागवत टोंगळे, पी.सी.पाटील उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष कालिदास कळसकर यांनी शिक्षकांवर आधारित हृद्य कविता सादर केली. यावेळी गावातील प्रथम महिला पीएचडी (हिंदी विषय) भावना बडगुजर तसेच रवींद्र टोंगळे (माध्यमिक शाळा, मनुर बु.), संतोष वाघ (पर्यवेक्षक, रा. धों. माध्यमिक विद्यालय, कुऱ्हे पानाचे), प्रवीण गांधेले (उच्च माध्यमिक विद्यालय, बामणोद), संजय नाईक (रा.धों.माध्यमिक विद्यालय, कुऱ्हे पानाचे), सुरेश कापसे (के. नारखेडे विद्यालय, भुसावळ), आरती निकम (श्रीराम प्राथमिक विद्यालय, कुऱ्हे पानाचे), वैशाली सानप (जिल्हा परिषद मराठी मुलींची शाळा, कुऱ्हे पानाचे) यांचा आई प्रतिष्ठानतर्फे जि. प. माजी सदस्य विश्वनाथ पाटील, समाधान पवार, डॉ.टी. टी. बारी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरविंद बावस्कर यांनी केले.


# पाणी योजनांना वीज कनेक्शनचा फटका

## ● बहुतांश ग्रामपंचायतींकडे थकबाकी असल्याने विजेचे कनेक्शन मिळाले नाही

**प्रतिनिधी । जळगाव**

जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेंतर्गत १३०० हून अधिक पाणी योजनांना मंजुरी मिळाली आहे. त्यापैकी निम्म्याहून अधिक पाणी योजना पूर्णही झाल्या. मात्र निम्म्या योजनांना वीज कनेक्शनचा फटका बसला आहे.

वीज कनेक्शनअभावी या पाणी योजना काम पूर्ण होऊनही सुरू झालेल्या नाहीत. त्यामुळे योजनांच्या माध्यमातून ग्रामस्थांना अजूनही पाण्याची प्रतिक्षाच नशिबी आली आहे. सध्यास्थितीत पाणी योजनांची देयके शासनाकडे प्रलंबित असल्याने मक्तेदारांची मोठी अडचण झाली आहे. गेल्या वर्षभरापासून कामे करूनही पाणी योजनांच्या मक्तेदारांना बिलासाठी शासनाकडे वांरवार मागणी करावी लागत आहे. जिल्हा परिषदेसमोर पाणी योजनांच्या बिलांसाठी मक्तेदारांनी एक दिवसीय आंदोलन केले. मात्र आंदोलनानंतरही शासनाकडून ठेकेदारांच्या बिलाची दखल घेण्यात आलेली नाही. जिल्ह्यातील गावागावात घर घर जल हर घर जल यानुसार प्रत्येक



नागरीकाला पाणी मिळावे यासाठी ही महत्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली. त्यामाध्यमातून जिल्हाभरात योजना हाती घेण्यात आल्या.

मात्र बहुतांश योजना पूर्ण झाल्या. परंतु विजेच्या कनेक्शनअभावी बहुतांश योजना पूर्ण होऊन बंद स्थितीत आहेत. पालकमंत्री तथा पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी बैठकीत वीज वितरण विभागाला तातडीने वीज कनेक्शन देण्याचे आदेश दिले होते. मात्र तरीही अद्याप बहुतांश ठिकाणी ग्रामपंचायतींकडे थकबाकी असल्याने विजेचे कनेक्शन महावितरणकडून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे योजना असूनही गावांना पाणी मिळत नसल्याची स्थिती आहे. जल जीवन मिशन ही योजना केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राबविली जाते. मात्र गेल्या काही महिन्यापासून केंद्र शासनाने या योजनांचा निधी देण्यात आखडता हात घेतला आहे. कोट्यावधीच्या योजनांसाठी अत्यल्प निधी येत असल्याने यंत्रणेलाही कामे पूर्ण करून घेण्यासाठी कसरत करावी लागत आहे.

### ● जिल्ह्यात मक्तेदारांनी फिरवली पाठ

**जिल्हाभरातील पाणी योजनांची कामे वेळेत पूर्ण न करणाऱ्या ३९ मक्तेदारांनी कामे काढून घेण्यात आली होती. त्यानंतर या कामांची फेरनिविदा करण्यात आल्या. मात्र ही कामे कुणी घेत नसल्याने ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने १५ वेळा निविदा प्रक्रिया राबविली. बिलांची देयके मिळत नसल्याने मक्तेदारांनी पाठ फिरवली. पाणी योजनांच्या बिलांसाठी वारंवार चकरा माराव्या लागल्याने मक्तेदार हवालदिल झाला आहे.**

# ऑनलाईन बेटिंगवर पोलिसांचा छापा : दोन जणांना घेतले ताब्यात!

**प्रतिनिधी । भुसावळ**

भारत विरुद्ध पाकीस्तान क्रिकेट मॅचरव ऑनलाईन बेटींग (सट्टा) खेळविणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकत कारवाई केली. याठिकाणाहून संशयित प्रकाश हुदामल कारडा (वय ५५, रा. सिंधी कॉलनी, भुसावळ) व रणजीत चत्रभान हंडी (वय ३५, रा. गणपतीनगर) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १ लाख ५ हजारांचे बेटींगचे साहित्य जप्त केले आहे.

भुसावळातील बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिंधी कॉलनी परिसरात प्रकाश कारडा हा त्याच्या राहत्या घरी भारत विरुद्ध पाकीस्तानच्या क्रिकेट मॅचवर ऑनलाईन बेटींग (सट्टा) खेळवित असल्याची माहिती पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना मिळाली. त्यांनी लागलीच पथकातील उपनिरीक्षक शरद बागल, रवी रनवाडे, उमाकांत पाटील, विकास सातदिवे, राहुल वानखेडे, प्रशांत परदेशी, मपोकॉ दर्शना पाटील, भरत पाटील यांचे पथक रवाना केले. या पथकाने बेटींग करणाऱ्या कारडाच्या घरावर छापा टाकला असता, त्याठिकाणी प्रकाश कारडा व रणजीत हंडी या दोघांकडून १ लाख ५ हजारांचे साहित्य जप्त करण्यात आले.